e-mail : atmkmt@gmail.com ☎ 2644566 To 2644571
Tele. Fax No. (0231) 2644608

कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम
श्री शाहू क्लॉथ मार्केट, उत्तर कक्ष, पहिला मजला,
'सी' वॉर्ड, सोमवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ००२.

# कंत्राटी पध्दतीने वाहन चालकांची व संगणक चालकांची नियुक्ती करणेसाठी जाहिरात "वॉक-इन-इंटरव्ह्यू"

कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वाहतूक विभागाकडे कंत्राटी वाहन चालकांची व कंत्राटी संगणक चालकांची नियुक्ती करणेसाठी उमेदवारांची निवड यादी तयार करणेकरितां उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत. सदरच्या विहीत नमुन्यातील अर्ज तसेच कागदपत्रांच्या मूळ व छायांकित सत्यप्रतींसह वाहन चालक उमेदवारांनी बुधवार दि.१५/०३/२०१७ रोजी स.१०.३० वा. व संगणक चालक उमेदवारांनी गुरुवार दि.१६/०३/२०१७ रोजी स.१०.३० वा. परिवहन उपक्रमाच्या श्री शाहू क्लॉथ मार्केट, ''सी'' वॉर्ड, सोमवार पेठ,कोल्हापूर येथील मुख्य कार्यालयामध्ये कागदपत्रांच्या छाननीसाठी उपस्थित रहाणेचे आहे.

| (१) पदाचे नांव | कंत्राटी वाहन चालक |
|---|---|
| मुलाखतीचा दिनांक | बुधवार दि.१५/०३/२०१७ रोजी स.१०.३० वा. |
| संख्या | ५० |
| एकवट मासिक वेतन | मासिक रु.१०,०००/- इतके एकवट वेतन ज्या-त्या महिन्यामध्ये केलेल्या कामाच्या प्रमाणात देणेत येईल. या व्यतिरिक्त इतर कोणतेही आर्थिक व इतर लाभ देणेत येणार नाहीत. |
| शैक्षणिक अर्हता : | १. खुल्या प्रवर्गाकरितां वयोमर्यादा ३३ वर्षे व राखीव प्रवर्गाकरितां ३८ वर्षापेक्षा वय जास्त नसावे.<br>२. हेवी ड्रायव्हींग लायसेन्स व बॅज असणारा.<br>३. हेवी ड्युटी ड्रायव्हींगचा ५ वर्षे अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.<br>४. कमितकमी ४ थी परिक्षा पास.<br>५. शारिरिक पात्रता प्रमाणपत्र आवश्यक. |

| (२) पदाचे नांव | कंत्राटी संगणक चालक |
|---|---|
| मुलाखतीचा दिनांक | गुरुवार दि.१६/०३/२०१७ रोजी स.१०.३० वा. |
| संख्या | ०८ |
| एकवट मासिक वेतन | मासिक रु. ७,०००/- इतके एकवट वेतन ज्या-त्या महिन्यामध्ये केलेल्या कामाच्या प्रमाणात देणेत येईल. या व्यतिरिक्त इतर कोणतेही आर्थिक व इतर लाभ देणेत येणार नाहीत. |
| शैक्षणिक अर्हता : | १. खुल्या प्रवर्गाकरितां वयोमर्यादा ३३ वर्षे व राखीव प्रवर्गाकरितां ३८ वर्षापेक्षा वय जास्त नसावे.<br>२. कोणत्याही शाखेचा पदवीधर.<br>३. एमएससीआयटी उत्तीर्ण. |

| | |
|---|---|
| | ४. इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. उत्तीर्ण.<br>५. एमएस वर्ड, एक्सेल, पॉवर पॉईन्ट, डी.टी.पी., टॅली इ. प्रकारचे इंग्रजी व मराठी संगणकीय कामकांजाचा अनुभव.<br>६. शारिरिक पात्रता प्रमाणपत्र आवश्यक. |

**(१) उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना :**

१. मागासवर्गीय उमेदवारांसाठी शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथीलक्षम राहील.

२. या जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या कमी-जास्त किंवा रद्द होण्याची शक्यता आहे.

३. माजी सैनिकांसाठी उमेदवारांचे वयाबाबत शासन निर्णयानुसार सवलत राहील.

४. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी ते जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटी पूर्ण करतात त्याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच अर्ज करावेत.

५. जाहिरातीमध्ये दर्शविलेली अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

६. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदाची किमान व कमाल वयोमर्यादा जाहिरात दिनांकास साक्षेप समजण्यात येईल.

७. उमेदवाराने जाहिरातीमध्ये दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्जासह व कागदपत्रांच्या मूळ व छायांकित सत्यप्रतींसह ''वॉक-इन-इंटरव्ह्यू'' साठी उपस्थित रहाणेचे आहे. अपुरी कागदपत्रे असणारे अगर अर्हता धारण न करणारे उमेदवार वाहन चालक चाचणीसाठी पात्र ठरणार नाहीत.

८. अर्ज A4 आकाराच्या चांगल्या दर्जाच्या कागदावर विहीत नमुन्यात टंकलिखीत/संगणकीकृत करावा. तसेच वेबसाईटवर अर्जाच्या नमुन्यासोबत प्रसिध्द केलेल्या ''**कंत्राटी वाहन चालक / कंत्राटी संगणक चालक**'' या पदावर काम करण्यासाठीच्या अटी व शर्तीवर मान्यतादर्शक स्वाक्षरी, साक्षीदारांच्या पुर्ततेसह, करुन देणेची आहे.

९. पात्रता, अर्जाची स्वीकृती किंवा तो नाकारणे, चुकीची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

कोल्हापूर,
दिनांकः- ०६/०३/२०१७.

आयुक्त आणि परिवहन व्यवस्थापक,
कोल्हापूर महानगरपालिका.

# अर्जाचा नमुना

अर्जाचा नोंदणी क्रमांक :

ओळखपत्र आकाराचे छायाचित्र

प्रति,
मा. आयुक्त आणि परिवहन व्यवस्थापक,
कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम,
कोल्हापूर.

विषयः- **'कंत्राटी वाहन चालक / कंत्राटी संगणक चालक '** पदासाठी अर्ज.

(१) संपूर्ण नांव :

(२) पत्ता :

(३) लिंग :

(४) जात : प्रवर्ग :

(५) जन्म दिनांक : - -

(६) जाहिरात दिनांकास वय : वर्षे - महिने - दिवस -

(७) सेवायोजन कार्यालयात नांव नोंदविल्याचा तपशील : कार्यालयाचे नांव :- नोंदणी क्रमांक दिनांक

(८) अर्जदार अपंग आहे काय ? होय/नाही

(९) अर्जदार लष्करातील माजी सैनिकातील आहे काय ? होय/नाही

(१०) अर्जदार प्रकल्पग्रस्त आहे काय ? होय/नाही

| (११) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशील) | विद्यापीठाचे / परिक्षा मंडळाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | घेतलेले विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अ) | | | | |
| ब) | | | | |
| क) | | | | |
| ड) | | | | |

(१२) सदर पदाचा पुर्वानुभव आहे काय ? (असल्यास खालील रकान्यात तपशील द्यावा.)
होय/नाही

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव व पूर्ण पत्ता | धारण केलेले पद | कार्यालय / संस्था शासकीय आहे काय? | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी पासून पर्यन्त |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

<u>उमेदवाराने करावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

मी असे प्रमाणित करतो/करते कीं, या अर्जात दिलेली माहिती खरी आहे. त्यापृष्ट्यर्थ मी चाचणीवेळी प्रमाणपत्राच्या मूळप्रती सादर करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते कीं, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस/नियुक्ती रद्द होईल, याची मला जाणीव आहे. त्यासंबंधीचा नियुक्ती प्राधिकाऱ्याचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील आणि त्यासंबंधी माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :- ................ अर्जदाराची स्वाक्षरी :- .........................

दिनांक :- ................. नांव:- ________________

सोबत:-

**कंत्राटी चालक / संगणक चालक** या पदावर काम करण्यासाठीच्या अटी व शर्तीवर मान्यतादर्शक स्वाक्षरी, साक्षीदारांच्या पुर्ततेसह, करुन जोडली आहे.

# कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम

## ''कंत्राटी वाहन चालक'' या पदावर काम करण्यासाठी अटी व शर्ती पुढीलप्रमाणे

(१) ''कंत्राटी वाहन चालक'' या पदासाठी उमेदवाराजवळ जड वाहन चालविण्याचा निर्दोष तथा प्रृष्ठांकित परवाना आणि प्रवासी वाहन चालविण्याचा बिल्ला (बॅज) असणे आवश्यक आहे.

(२) ''कंत्राटी वाहन चालक'' या पदासाठी मासिक रु.१०,०००/- इतके मासिक एकवट वेतन ज्या-त्या महिन्यामध्ये केलेल्या कामाच्या प्रमाणात देणेत येईल. या व्यतिरिक्त ते कोणत्याही आर्थिक व इतर लाभासाठी पात्र ठरणार नाहीत.

(३) ''कंत्राटी वाहन चालक'' म्हणून काम करीत असतांना, बस चालक याच्याकडून कोणत्याही प्रकारचे परिवहन उपक्रमाचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याच्या मेहनतान्यामधून सदरची रक्कम कपात करुन घेणेत येईल अथवा होणारे नुकसान एक दिवसाच्या मेहनतानाच्या रकमेपेक्षा अधिक असल्यास त्यापुढील कामाच्या मिळणाऱ्या मेहनतान्यामधून सदरचे नुकसान वसूल करण्यात येईल.

(४) उपक्रमाच्या आवारात प्रवेश करण्यासाठी बस चालकांना प्रवेश परवाना देणेत येईल. सदर परवान्यावर कामावर नसतांना उपक्रमाच्या बसगाडीमधून विनामूल्य प्रवास करतां येणार नाही.

(५) ''कंत्राटी वाहन चालक'' यांनी स्वतःचा वाहन चालन परवाना स्वतः वेळोवेळी मुदतीत नुतनीकरण करुन घेणेचा आहे.

(६) ''कंत्राटी वाहन चालक'' यांना काम उपलब्ध असेल तेव्हां दिलेले काम करणे बंधनकारक आहे. परिवहन उपक्रमाकडील कामाची उपलब्धता व निकड पाहून काम उपलब्ध करुन दिले जाईल.

(७) कंत्राटी कालावधीत परिवहन उपक्रमाच्या सोईनुसान कंत्राटी चालकाची गरज नाही, असे आढळून आलेस मुदतीपूर्वी कंत्राटी चालकास कमी करणेचा अधिकार परिवहन उपक्रमास राहील.

(८) ''कंत्राटी वाहन चालक'' म्हणून काम करणाऱ्या बस चालक यांनी नेमणूक करण्यापूर्वी परिवहन उपक्रमाने ठरवून दिलेला खाकी गणवेश स्वखर्चाने तयार करुन घेणेचा आहे.

(९) अशा कंत्राटीवर काम करणाऱ्या बस चालकाचे काम, वर्तणूक व हजेरी असमाधानकारक असेल तर त्याचे नांव कंत्राटी यादीमधून कमी करणेत येईल.

(१०) ''कंत्राटी वाहन चालक'' म्हणून काम करीत असतांना, उपक्रमामध्ये कायमस्वरुपी नोकरीसाठी कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क किंवा मागणी विचारात घेणेत येणार नाही.

(११) ''कंत्राटी बस चालकास'' त्याची नेमणुकीची मुदत संपल्यानंतर अगर परिवहन उपक्रमाकडून त्यांच्या सेवा संपुष्टात आणलेनंतर ग्रॅच्युईटी कॉम्पेन्सेशन, सानुग्रह अनुदान व सेवानिवृत्तीचे कोणतेही फायदे त्यांना देण्यात येणार नाहीत.

(१२) ''कंत्राटी वाहन चालक'' यांनी नेमणुकीच्या काळात परिवहन उपक्रमासारख्या संलग्न संस्थेत काम करणेचे नाही.

(१३) परिवहन उपक्रमाकडे बस वाहन चालकाचे काम उपलब्ध नसलेस कंत्राटी म्हणून करणेत आलेली नियुक्ती रद्द करणेत येईल.

वरील अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या मला मान्य आहेत.

सही :- ____________________

उमेदवाराचे नांव :-

<u>साक्षीदार</u> :

सही :- ____________________

नांव :- ____________________

पत्ता :- ____________________

____________________

# कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम

## ''कंत्राटी संगणक चालक'' या पदावर काम करण्यासाठी अटी व शर्ती पुढीलप्रमाणे

(१) ''कंत्राटी संगणक चालक'' या पदासाठी मासिक रु.७,०००/- इतके मासिक एकवट वेतन ज्या-त्या महिन्यामध्ये केलेल्या कामाच्या प्रमाणात देणेत येईल. या व्यतिरिक्त ते कोणत्याही आर्थिक व इतर लाभासाठी पात्र ठरणार नाहीत.

(२) अशा कंत्राटीवर काम करणाऱ्या संगणक चालकाचे काम, वर्तणूक व हजेरी असमाधानकारक असेल तर त्याचे नांव कंत्राटी यादीमधून कमी करणेत येईल.

(३) ''कंत्राटी संगणक चालक'' म्हणून काम करीत असतांना, उपक्रमामध्ये कायमस्वरुपी नोकरीसाठी कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क किंवा मागणी विचारात घेणेत येणार नाही.

(४) ''कंत्राटी संगणक चालकास'' त्याची नेमणुकीची मुदत संपल्यानंतर अगर परिवहन उपक्रमाकडून त्यांच्या सेवा संपुष्टात आणलेनंतर ग्रॅच्युईटी कॉम्पेन्सेशन, सानुग्रह अनुदान व सेवानिवृत्तीचे कोणतेही फायदे त्यांना देण्यात येणार नाहीत.

(५) ''कंत्राटी संगणक चालक'' यांनी नेमणुकीच्या काळात परिवहन उपक्रमासारख्या संलग्न संस्थेत काम करणेचे नाही.

वरील अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या मला मान्य आहेत.

सही :-

उमेदवाराचे नांव :- ______________________________

साक्षीदार :

सही :- ______________________________

नांव :- ______________________________

पत्ता :- ______________________________

______________________________